**ठळक बातम्या**

- विधानसभा निवडणुकीसाठी आसाममध्ये ८५ टक्के केरळात ७८ तर पुदुचेरीमध्ये जवळपास ९० टक्के मतदान/ प्रथमच संपूर्ण मतदान प्रक्रीयेचं वेब कास्टिंग

- पश्चिम बंगाल निवडणुकीसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रसिद्ध

- नीतीशकुमार यांचा राज्यसभा सदस्यत्वाचा शपथविधी संपन्न

**आणि**

- वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांचा आज पदाचा राजीनामा

<><><><><>

आसाम, केरळ आणि पुदुचेरी विधानसभा निवडणुकांसाठी काल शांततेत मतदान झालं. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, आसाममध्ये ८५ पूर्णांक ३८ शतांश टक्के तर पुदुचेरीमध्ये जवळपास ९० टक्के मतदान झालं. दोन्ही राज्यातली मतदानाची ही आतापर्यंतची सर्वाधिक टक्केवारी आहे. केरळमध्येही ७८ टक्क्यांपेक्षा जास्त मतदानाची नोंद झाली. कर्नाटकात बागलकोट आणि दावणगिरी दक्षिण या विधानसभा मतदारसंघांच्या पोटनिवडणुकीसाठी साठ टक्क्यांच्या वर मतदान नोंदवलं गेलं, तर नागालँडमधल्या कोरिडांग मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीत ८३ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान झालं. ही मतदान प्रक्रिया सुरू असताना मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, डॉक्टर एस.एस. संधू आणि डॉक्टर विवेक जोशी या अन्य दोन निवडणूक आयुक्तांसमवेत थेट वेबकास्टिंगद्वारे या प्रक्रियेचं निरीक्षण करत होते. यंदा प्रथमच या भागांतल्या सर्व मतदान केंद्रांचं वेबकास्टिंग करण्यात आलं. याशिवाय सर्व इव्हीएम मतपत्रिकांवर उमेदवारांची रंगीत छायाचित्रं, मतदारांना त्यांचे मोबाईल फोन ठेवण्यासाठी खास सोय, नव्याने डिझाईन केलेल्या मतदार

माहितीपत्रिका, प्रत्येक मतदान केंद्रावर बाराशे मतदारांची मर्यादा अशा मतदारस्नेही उपाययोजनाही या निवडणुकांमध्ये प्रथमच राबवण्यात आल्या.

**<><><><><>**

तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकांसाठी विविध राजकीय पक्षांच्या वरिष्ठ नेते प्रचारसभा घेत असल्यानं या दोन्ही राज्यांमध्ये प्रचाराला चांगलाच वेग आला आहे.

तामिळनाडूतही प्रचार शिगेला पोहोचला असून भाजपचे केंद्रीय पातळीवरील वरिष्ठ नेते राज्यात प्रचारसभा घेत आहेत. तर सत्तारुढ द्रमुक आणि अण्णा द्रमुकसह मुख्य विरोधी पक्षांचे सर्व प्रमुख नेते संपूर्ण राज्यातले मतदारसंघ पिंजून काढत आहेत. तमिळनाडूच्या राजकारणात पदार्पण करणारा अभिनेता विजय याच्या नेतृत्वाखाली टीव्हीके पक्षाचा प्रचारही जोमाने सुरु आहे. तमिळनाडूच्या सर्व मतदारसंघात येत्या २३ एप्रिलला मतदान होईल.

**<><><><><>**

पश्चिम बंगालविधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीचा जाहीरनामा आज ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी प्रसिद्ध केला. संकल्प पत्र नावाने प्रकाशित या घोषणापत्रात महिला,युवावर्ग आणि सरकारी कर्मचाऱ्यांना मोठी आश्वासनं दिली आहेत.

सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात वाढ , महिलांना दर महिन्याला ३ हजार रुपये मदत, युवा साथी योजना इत्यादी घोषणांचा त्यात समावेश आहे. सर्वच पक्षांचे नेते राज्यात प्रचार जोमाने करत आहेत.

पहिल्या टप्प्यात २३ एप्रिलला मतदान होणार असून १५२ जागांसाठी एक हजार ५८६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी दाखल झालेल्या उमेदवारी अर्जाची छाननी आज होत आहे. या टप्प्यात १४२ जागांसाठी मतदान होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख १३ एप्रिल असून २९ एप्रिलला मतदान होणार आहे.

निवडणुकीचे दोन्ही टप्पे पूर्ण झाल्यानंतर ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे.

दरम्यान, राज्यात चोख पोलिस बंदोबस्त ठेवला असून अनुचित प्रकार रोखण्यासाठी ठिकठिकाणी रात्री दहा ते पहाटे दोन वाजेपर्यंत पोलिस गस्त घातली जात आहे.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये असद्दुीन ओवैसी यांच्या ए.आय.एम.आय.एम. नं हुमायूं कबीर यांच्या आम जनता उन्नयन पक्षाबरोबरची युती तोडली आहे.. मुस्लिमांच्या इमानदारीबाबत शंका निर्माण करणाऱ्या पक्षाबरोबर जाणार नसल्यानं ही युती तात्काळ संपुष्टात आणत आहोत. तसंच पश्चिम बंगालमधे स्वबळावर लढणार असून कोणत्याही पक्षाशी युती करणार नाही, असं पक्षानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. एका छोटयाशा समारंभात राज्यसभेचे अध्यक्ष उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. रालोआ तर्फे येत्या १४ तारखेला बिहारच्या नवीन मुख्यमंत्र्यांची निवड होण्याची शक्यता आहे.

<><><><><>

जातनिहाय जनगणना थांबवण्याचे निर्देश केंद्राला द्यावेत, अशी मागणी करणारी याचिका आज सर्वोच्च न्यायालयानं फेटाळून लावली. एकच मूल असलेल्या कुटुंबांना आर्थिक प्रोत्साहनपर रक्कम द्यावी, अशी मागणीही या याचिकेत करण्यात

आली होती. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाला बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठानं ही याचिका फेटाळून लावली.

**<><><><><>**

देशात गेल्या १ तारखेला जनगणना- २०२७ चा पहिला टप्पा सुरु झाला असून आतापर्यंत ७२ लाख कुटुंबांनी स्वगणना पर्यायाचा अवलंब केला आहे. ही सुविधा देशात पहिल्यांदाच उपलब्ध करण्यात आली आहे. ११ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरू असलेल्या पहिल्या टप्प्यासाठी ती १५ एप्रिलपर्यंत उपलब्ध असेल. जनगणना २०२७ च्या डिजिटल उपक्रमात अधिकाधिक नागरिक सहभागी होत आहेत, हेच यावरून दिसत आहे, असं रजिस्ट्रार जनरल म्हणाले.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी राज्यसभेचे मावळते उपाध्यक्ष हरिवंश यांची राज्यसभेचे सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे. हरिवंश यांचा कार्यकाळ काल समाप्त झाला. माजी सरन्यायाधीश रंजन गोगोई राज्यसभेतून निवृत्त झाल्यानंतर रिकाम्या झालेल्या जागेवर हरिवंश यांची नियुक्ती झाली आहे. गृह मंत्रालयानं आज याबाबतची अधिसूचना जारी केली.

**<><><><><>**

वादग्रस्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांनी आज पदाचा राजीनामा दिला. अलाहाबाद न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून काम करत असताना वर्मा यांच्या निवासस्थानी मोठ्या प्रमाणात जळालेल्या नोटा आढळल्याप्रकरणी त्यांच्यावर महाभियोग चालवण्यात येत होता. राजीनाम्यासाठी वेगळं कारण न देता, आपण अतिशय शोकसंतापाने पदाचा राजीनामा देत असल्याचं त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना उद्देशून लिहीलेल्या राजीनामापत्रात म्हटलं आहे.

**<><><><><>**

किर्गिझिस्तानमधील बिश्केक इथं सुरू असलेल्या वरिष्ठ गट आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या मीनाक्षी गोयतनं दक्षिण कोरियाच्या सियोयंग पार्कचा पराभव करून महिलांच्या ५३ किलो वजनी गटाची अंतिम फेरी गाठली. ५५ किलो वजनीगटात हंसिका लांबाने ५९ किलो वजनी गटात तर नेहाने कांस्यपदक मिळवलं. हर्षिता आणि मोनिका या कुस्तीपटू आज आपापल्या गटात कांस्यपदकासाठी खेळतील. स्पर्धेच्या पहिल्या तीन दिवसांत पुरुषांच्या 'ग्रीको-रोमन' गटातील कुस्तीपटूंनी दोन रौप्य आणि तीन कांस्य पदकं पटकावली होती.

**<><><><><>**

आय पी एल क्रिकेट मध्ये आज राजस्थान रॅायल्सचा सामना रॅायल्स चॅलेर्जंस बेगंळुरु बरोबर होणार आहे. या सामन्याला संध्याकाळी साडेसात वाजता गुवाहाटीमधे सुरुवात होईल.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३० वर काल रात्री झालेल्या भीषण अपघातात सहा जण ठार झाले. नाथिया नवागाव इथं दोन गाड्या समोरासमोर आदळून हा अपघात झाला. या अपघातात तीनजण गंभीर जखमी झाले असून त्यांना कांकेर वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

आज जागतिक होमिओपॅथी दिन साजरा होत आहे. होमिओपॅथी या उपचारपद्धतीचे जनक डॉ. सॅम्युएल हॅनेमान यांच्या जयंतीदिनी म्हणजे दरवर्षी 10 एप्रिलला हा दिवस साजरा केला जातो. 'शाश्वत आरोग्यासाठी होमिओपॅथी' ही या वर्षीच्या जागतिक होमिओपॅथी दिनाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

भारताच्या संविधानाची सिंधी भाषेतली आवृत्ती आज प्रकाशित झाली. देवनागरी लिपीत लिहीलेल्या या प्रतीचं प्रकाशन उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते झालं. केंद्रीय विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

इसरो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेनं आगामी गगनयान मोहिमेसाठी दुसरी एकात्मिक एअर ड्रॉप चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली. आंध्र प्रदेशातल्या श्रीहरीकोटा इथं ही चाचणी करण्यात आली. अंतराळवीर ज्या कॅप्सूलमध्ये बसतात, तिला पृथ्वीच्या आवरणात पुन्हा प्रवेश करता यावा आणि सुखरूप उतरता यावं, यादृष्टीनं ही चाचणी महत्त्वपूर्ण मानली जाते.

केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल इसरोचं अभिनंदन केलं आहे.

//<><><><><>//